# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

# विद्यार्थी परिषद 2023-24

## गुणवंत सत्कार कार्यक्रम (Felicitation program)

22 July 2023

**Report**

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री येथे विद्यार्थी परिषदेच्या वतीने दिनांक 22 जुलै 2023 रोजी शैक्षणिक वर्ष 2022-23 मधील परिसरातील बी.ए., बी.कॉम., बीएस्सी., एम.कॉम., तसेच तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातून १२ वी (कला, वाणिज्य व विज्ञान) या विद्याशाखेत प्रथम आलेल्या तसेच इतर परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या सत्कार समारंभाचे अध्यक्ष म्हणून मा. श्री हरिभाऊ बागडे (नाना), (आमदार, फुलंब्री मतदारसंघ व अध्यक्ष, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था) हे होते.

तसेच माजी प्राचार्य व समुपदेशक डॉ. अशोक वाकोडकर हे या सत्कार समारंभाचे प्रमुख मार्गदर्शक होते. पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष,मा. श्री देवजीभाई पटेल, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री श्यामसुंदर नाईक, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे निमंत्रित सदस्य प्राचार्य डॉ. प्रदीप जब्दे यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

गुणवंत सत्कार कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस.आर.टकले यांनी केले.

गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. वाकोडकर म्हणाले की, शाळा आणि कुटुंबातून ज्ञान आणि संस्कार देण्याचे काम केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात कायापालट घडून येतो. म्हणून हे मिळणारे ज्ञान आणि संस्कार विद्यार्थ्यांनी आपल्या हृदयात जपून ठेवावे. सद्य:स्थितीत सामाजिक स्थिती दोलायमान असल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे समाज व कुटुंब प्रबोधनाची गरज भासते आहे. याचाही विद्यार्थ्यांनी विचार करून प्रतिकूल परिस्थितीत यशपर्यंत कसे पोहचता येईल याचा विचार करावा. यासाठी जिद्द आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. ग्रामीण भागातील आहोत म्हणून कोणताही न्यूनगंड बाळगता कामा नये, असा सल्ला त्यांनी दिला.

माजी प्राचार्य डॉ. जब्दे सर यांनी शिक्षण व्यवस्थेवर भाष्य करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच संस्थचे सचिव श्री श्यामसुंदर नाईक यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप करताना मा. नाना म्हणाले की, विद्यार्थ्यांना बौद्धिक भूक लागली पाहिजे आणि ती व्यापक असावी, ती भूक शांत करण्यासाठी ज्ञान घेण्याची लालसा ठेवावी. विविध स्पर्धांना सामोरे जाण्याचा प्रयत्न करावा. सतत मनन, चिंतन करून बौद्धिक क्षमतांचा विकास करावा. अभ्यासामध्ये सततच्या चुका करू नयेत, चुका झाल्याच तर त्या दूर करण्याचा प्रयत्न करावा, असा सल्ला दिला.

यावेळी तालुक्यातील  एकूण शाळा / महाविद्यालयातील 36 गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

उपस्थित मान्यवरांचा परिचय प्रा. डॉ.पांडुरंग कल्याणकर यांनी करून दिला. तर प्रस्तुत समारंभाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. अश्विन रांजणीकर यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. विजय पांडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी परिषदेचे प्रमुख, प्रा. विजय पांडे, प्रा. डॉ. दिनेश कचकुरे यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.



गुणवंत सत्कार कार्यक्रम: उपस्थित विद्यार्थी




गुणवंत सत्कार कार्यक्रम: मार्गदर्शन करताना डॉ. अशोक वाकोडकर




गुणवंत सत्कार कार्यक्रम: अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन करताना मा. श्री हरिभाऊ बागडे (नाना)

# विकसित भारत @ 2047

मान्नीय कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार व आपल्या पत्रानुसार आमच्या महाविद्यालयात दिनांक 11 डिसेंबर 2023 रोजी सकाळी 10:30 वाजता विकसित भारत @ 2047 या विषयावर भारताचे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचे संबोधन आमच्या महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांच्यासाठी ऑनलाइन पद्धतीने आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास उपस्थित प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे फोटो






# विद्यार्थी परिषद 2023-24

## सचिव निवड

आज दिनांक 5 फेब्रुवारी 2024 रोजी सकाळी 11:00 वाजता प्राचार्य कक्षामध्ये मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी परिषदेच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीमध्ये शैक्षणिक वर्ष 2023-24 साठीचा विद्यार्थी परिषदेचा सचिव म्हणून चंद्रमणी बनसोडे याची सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीस विद्यार्थी परिषदेचे प्रभारी प्राध्यापक प्रा. विजय पांडे यांच्यासह विद्यार्थी परिषद प्रतिनिधी उपस्थित होते.

# "सावता भूषण" पुरस्कार

महाविद्यालयातील बी. ए., बी. कॉम. व बी. एस्सी. च्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना देऊन **"सावता भूषण"** या **पुरस्कारा**साठी फक्त तृतीय वर्षाच्या (BA, BCOM, BSC) विद्यार्थ्यांकडून **अर्ज** मागविण्यात आले.

विद्यार्थ्यांनी सावता भूषण पुरस्कारासाठी आवश्यक असलेला अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह विद्यार्थी परिषदेचे प्रमुख प्रा. विजय पांडे यांच्याकडे दि. **5 फेब्रुवारी 2024 दु. 3:00** वाजेपर्यंत जमा केले. एकूण 3 आर्ज आले. त्यामध्ये कु. आरती केजभट या विद्यार्थिनीस सावता भूषण या पुरस्काराने सन्मानित केले.